# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मनपा वाहने/मशिनरीचे देखभाल व दुरूस्ती अंतर्गत स्पेअरपार्ट
**{ कारखाना विभाग }** खरेदी व दुरूस्ती व हार्डवेअर मटेरियल खरेदी व्दिवार्षीक दरकरार करण्यास्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे पारित ठराव क्र. 1109/मा.स्थायी समिती/प्रशासक अन्वये ई-निविदा मागविण्यात आली असुन, सदर ई-निविदा कार्यान्वीत करण्यास्तव लागणारा कालावधी लक्षात घेता, मा.स्थायी समिती ठराव क्र. 291/वि.क्र.260, दि. 02/02/2022 अन्वये कार्यान्वीत दरकरारास दि. 30/06/2025 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यास्तव मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- विस्तृत माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1294/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 13/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता,(यांत्रिकी) कारखाना विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा वाहने/मशिनरीचे देखभाल व दुरूस्ती अंतर्गत स्पेअरपार्ट खरेदी व दुरूस्ती व हार्डवेअर मटेरियल खरेदी व्दिवार्षीक दरकरार करण्यास्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे पारित ठराव क्र. 1109/मा.स्थायी समिती/प्रशासक अन्वये ई-निविदा मागविण्यात आली असुन, सदर ई-निविदा कार्यान्वीत करण्यास्तव लागणारा कालावधी लक्षात घेता, मा.स्थायी समिती ठराव क्र. 291/वि.क्र.260, दि. 02/02/2022 अन्वये कार्यान्वीत दरकरारास दि. 30/06/2025 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.